३. स्थळदर्शक नकाशावर दाखविल्याप्रमाणे रस्त्यापासून प्रस्तावित बांधकामाचे अंतर व नियोजित बांधकामापासून, पुढील, मागील व बाजुंची अंतरे प्रत्यक्षात जागेवर असली पाहिजेत.
४. प्रकरणातील उपअधिक्षक भुमि अभिलेख कल्याण यांचे कार्यालयाकडील मोजणी नकाशाने केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे अधिन राहून सदरची शिफारस करणेत येत आहे. नियोजित विकासकामामुळे विषयाधीन जमिनीचे वहीवाटीचे/हद्दीचे अनुषंगाने कोणतेही व्यक्तीगत वा न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/वास्तुविशारद यांची राहील.
५. नियोजित इमारतीच्या वापरासाठी आवश्यक असलेली सांडपाण्याची व मलनिस्सा:रणाची व्यवस्था उपलब्ध नसल्यास इमारतीच्या वापरापूर्वी अर्जदाराने स्वखर्चाने करणे आवश्यक आहे.
६. प्रकरणी तळमजल्यावरील स्वच्छता गृहे व इतर सुविधा या सुविधा गोडाऊनमधील सर्वांच्या वापरासाठी खुल्या ठेवण्यात याव्यात.
७. विषयांकित भूखंडावरील प्रस्तावित इमारतींचा वापर वाणिज्य (Godown) साठी इमारतीची उंची व मजले बांधकाम नकाशात दर्शविल्याप्रमाणे ठेवणे आवश्यक आहे.
८. प्रकरणातील बांधकामाच्या structural stability बाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधित नोंदणीकृत संरचनात्मक अभियंता व जमीन मालक/विकासक यांची राहील.
९. प्रकाश व वायुविजन यासाठी ठेवलेल्या खिडक्यांचे क्षेत्र हे १/१० पेक्षा कमी असणार नाही याची जबाबदारी विकासक/वास्तुविशारद/ संस्था यांची राहील.

१०. सदर प्रकरणी खालीलप्रमाणे प्रस्तावित बांधकामे करणेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

प्रस्तावित केलेल्या इमारतींचा तपशील					
जमिनीचे एकूण क्षेत्र (चौ. मी.)	अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र (चौ. मी.)	इमारत क्र.	प्रयोजन	प्रस्तावित मजल्यांची संख्या	प्रस्तावित 'P'-line बांधकाम क्षेत्र (चौ.मी)
१,७०,३६५.००	३०११२५.६१	गोदाम क्र. १	वाणिज्य	तळ + पहिला मजला	४७२०५.८६
		गोदाम क्र. २	वाणिज्य	तळ + पहिला मजला	३३६२४.८५
		गोदाम क्र. ३	वाणिज्य	तळ + पहिला मजला	३११९.६६
		गोदाम क्र.४	वाणिज्य	तळ + पहिला मजला	३११६.६२
		गोदाम क्र.५	वाणिज्य	तळ + पहिला मजला	४१७५.१५
		Driver rest room	वाणिज्य	तळ मजला	१५.००
		Admin blg (G+१)	वाणिज्य	तळ + पहिला मजला	४५०.००
		Canteen (G+१)	वाणिज्य	तळ + पहिला मजला	१८०.००
				एकूण क्षेत्र चौ. मी.	९१८८७.१४

११. इमारतीतील नळ फिटींगचे काम, सांडपाणी/पावसाचे पाणी यांची निर्गतीकरणाचे काम कोणत्याही महानगरपालिका किंवा नगरपालिका यांच्याकडे नोंदणीकृत प्लंबरकडून करुन घेणे आवश्यक आहे. सेप्टीक टँकचे साईज स्टँडर्डप्रमाणे असावेत, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत पासून सेप्टीक टॅन्कचे अंतर १२.० मी. राहणे आवश्यक आहे.

१२. अर्जदार यांनी प्रत्यक्ष वापरापूर्वी इमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या पिण्याचे पाणी तसेच सांडपाणी उपलब्धतेबाबत व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

१३. जमीन धारक, विकासक, कॉन्ट्रक्टर, वास्तुविशारद, स्ट्रक्चरल इंजिनिअर, साईट सुपरवाईजर यांची नावे फलकावर (Board) प्रसिध्द करणे तसेच बांधकामाचा तपशील दर्शविणारा, जागेचे स.नं./ क्षेत्र, प्रस्तावित मजले/बांधकाम क्षेत्र दर्शविणारा फलक जागेवर लावणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.

१४. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार अर्जदार यांनी बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

१५. विषयांकित इमारतीतील ओला कचरा व सुका कचरा यांचे वर्गीकरण व त्यांची विल्हेवाट लावणे याबाबत योग्य ती स्वंतत्र उपाय योजना ही भूखंडामध्ये इमारत वापर दाखल्यापूर्वी कार्यान्वित करणे जमीन मालकास/विकासकास बंधनकारक राहील.

१६. प्रकल्पाच्या ठिकाणी काम करणा-या कामगारांच्या पात्र शाळाबाहय मुलांसाठी शिक्षणाची सोय करणे जमीन मालकास/विकासकास बंधनकारक राहील.

१७. नवीन इमारतींच्या आतील बाजूस तसेच इमारती समोरील रस्त्याचे सी. सी. टी. व्ही. चित्रिकरण करण्यासाठी बांधकामाच्या ठिकाणी सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे जमीन मालकास/विकासकास बंधनकारक राहील.

१८. विषयांकित जागा किंवा तिचा भाग भूसंपादन अधिनियम, १८९४ तसेच भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ अनुसार किंवा महाराष्ट्र औद्योगिक अधिनियम, १९६६ या खालील भूसंपादनासाठी अधिसूचित केलेली नाही, याबाबतची खात्री महसूल विभागाकडून अर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.

१९. संदर्भित जागेचे क्षेत्र, स्थान, आकार, वापर वहिवाट, भोगवटादार, भाडेकरु, मालकी हक्काबाबत काही तक्रारी असल्यास त्याची, तसेच लगतच्या भूखंडधारकांच्या काही तक्रारी असल्यास त्याची, संपूर्ण जबाबदारी व त्यांचे निराकरण करणे अर्जदार/विकासक/मालक यांच्यावर बंधनकारक राहील.

२०. विषयाधीन जागेवरील बांधकामाचे मंजूर नकाशाप्रमाणे कार्यान्वयन, बांधकाम साहित्याची गुणवत्ता व दर्जा, प्रस्तावित इमारतीचे आर. सी. सी. डिझाईन, अग्निशमन व्यवस्था इत्यादीबाबत जमीन मालक/विकासकर्ता/ वास्तुविशारद/ सल्लागार अभियंता/स्ट्रक्चरल अभियंता यांची जबाबदारी राहील.

२१. विषयांकित जागेवरील बांधकाम करताना आय. एस. १३९२०-१९९३ भूकंपरोधक आर. सी. सी. डिझाईन अनुसार बांधकाम घटकांचे नियोजन अर्हताप्राप्त नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून घेणे आवश्यक असून त्यांचे देखरेखीखाली नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे अर्जदार/विकासकर्ता यांचेवर बंधनकारक राहील.

२२. महाराष्ट्र इमारत व इमारत कामगार नियम-२००७ मधील तरतुदी जमीन धारक विकासक यांचेवर बंधनकारक राहतील.

२३. नियोजित विकासकामांमुळे विषयाधीन जमिनीचे वहिवाटीचे /हद्दीचे अनुषंगाने कोणतेही व्यक्तीगत वा न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/वास्तुविशारद यांची राहील.

२४. विषयांकित प्रकरणी शासन निर्णय क्र.बीसीए-२००९/प्र.क्र.१०८/कामगार-७अ, दि. १७/०६/२०१० व शासन निर्णय क्र.बीसीए-२००९/प्र.क्र.१०८/कामगार ७अ, दि. २१ जुलै, २०११ अन्वये कामगार कल्याण उपकर रू. १,९५,६८,३००/- (अक्षरी रू. एक कोटी पंच्यान्नव लाख अडुसष्ट हजार तीनशे फक्त) अर्जदाराकडून वसूल करणे योग्य होईल. सदरचा भरणा केल्यानंतरच बांधकाम परवानगीबाबतचे आदेश निर्गमित करणे योग्य होईल. (सदर रक्कम पूर्व मंजूरीची रक्कम वगळून परिगणीत करण्यात आलेली आहे.)

सदर रक्कम ३१ मार्च २०२५ पर्यंत लागू असून तद्नंतर मात्र प्रचलित सुधारित वार्षिक मुल्यदर तक्त्यानुसार हिशोबित करून घेणे आवश्यक राहील.

२५. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ब मध्ये शासनाने नमूद केल्यानुसार प्रादेशिक योजना क्षेत्रासाठी लागू केलेले विकास शुल्क (DEVELOPMENT CHARGES) रू.- १,०७,५८,३००/- (अक्षरी रू. एक कोटी सात लाख अठ्ठावन्न हजार तीनशे फक्त) हिशोबित होत आहे. सदर रक्कमेचा भरणा नियोजन प्राधिकरण म्हणजेच जिल्हाधिकारी यांच्याकडे केल्यानंतरच सदर प्रकरणी बांधकाम परवानगीबाबतचे आदेश पारित करावेत. तसेच सदरची रक्कम अर्जदारास नोटीस दिल्यानंतर ३० दिवसाच्या कालावधित भरणे आवश्यक आहे. तद्नंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम १२४ E (३) अनुसार त्यावर वार्षिक १८% व्याज लागू होईल. त्याचा उल्लेख नोटीसमध्ये करणे आवश्यक आहे. (सदर रक्कम पूर्व मंजूरीची रक्कम वगळून परिगणीत करण्यात आलेली आहे.)

२६. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० नुसार SOLAR ASSISTED WATER HEATING (SWH) SYSTEM / ROOF TOP PHOTOVOLPAIC (RTPV) SYSTEM स्थापित करणे व ते कार्यान्वित ठेवणे अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील.

२७. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० नुसार रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

२८. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनूसार अर्जदार/विकासक यांना Gray Water Treatment and Recycling ची व्यवस्था स्वत:च्या जागेत करणे आवश्यक राहील.

२९. विषयांकित प्रकरणी जागेचा काही भाग BPCL वाहीनीने बाधित होत असल्याने उक्त संस्थेकडील दि.१७/०३/२०१७ रोजीचा ना-हरकत दाखला सादर केलेला आहे. तरी आपल्या स्तरावर शहानिशा होणे आवश्यक राहील.

३०. प्रस्तावित सर्व इमारती विशेष इमारती असल्याकारणे विषयांकित इमारतीकरीता मा.संचालक, अग्निशमन सेवा यांचेकडील ना-हरकत दाखला प्रमाणपत्र मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे स्तरावर सादर करणे आवश्यक आहे.

३१. विषयांकित जागेमधून २ उच्चदाब विद्युत वाहीन्यांची आखणी असल्याने उक्त वाहीन्यांपासुन आवश्यक त्या सुरक्षित अंतरावर बांधकाम प्रस्तावित केलेले आहे. तथापी संबंधित विभागाकडील ना-हरकत दाखला मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे कार्यालयाचे स्तरावर सादर करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३२. अर्जदार यांनी बांधकाम परवानगी आदेश निर्गमित झालेनंतर विषयांकित जागेची बिनशेती मोजणी करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. तसेच बिनशेती मोजणी मध्ये अर्जदार यांच्या भुखंड क्षेत्रात तफावत आल्यास त्याप्रमाणे सुधारित बांधकाम परवानगी घेणे अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील.

३३. अर्जदार/विकासक यांनी परवानगी व्यतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम ५२ ते ५५ नुसार संबंधित विभागाकडून उचित कार्यवाहीस पात्र राहतील.

३४. विषयांकित प्रकरणी राष्ट्रिय महामार्ग क्र. ३ रस्त्याच्या रुंदिकरणाने जागेचा काही भाग बाधित होत आहे. नियमानुसार नियंत्रण रेषा प्रस्तावित केलेली आहे. संबंधित विभागाचा ना-हरकत दाखला प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

३५. विषयांकित जागा भातसा उजवा तीर कालवा ३ किमी पट्ट्यात समाविष्ट आहे त्यामुळे संबंधित विभागाचा ना-हरकत दाखला प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

३६. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदार/विकासकावर/जमीन मालकांवर बंधनकारक राहील.

३७. शासन निर्देश क्र. टीपीएस-१८०८/१२५४/प्र.क्र.१२५७/०८/नवि-१३, दिनांक १०/०२/२०१० व मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्र.विविनि/टिपीव्ही-७/७००, दि. ३१/३/२०१६ अन्वये विहित केल्याप्रमाणे छाननी शुल्क रु. ४,३३,०००/- परिगणित होत आहे. अर्जदार यांनी चलन क्र. MH००५४५१९३८२० २४२५E, दि. २०/०७/२०२४ रोजी भारतीय स्टेट बँकेत भरणा करण्यात आलेली आहे.

३८. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुद क्र. ६.३ तक्ता ६-G टिप-१ नुसार ANCILLARY FSI अधिमुल्य @ १०%शुल्क रू. १३,११,०००/- चलन क्र. MH००५६११६६४२०२४२५E, दि. २३/०७/२०२४ अन्वये रक्कमेचा भारतीय स्टेट बँकेत भरणा केलेला आहे. (पूर्व मंजुरीवेळी भरणा केलेली रक्कम वजा करण्यात आलेली आहे.)

३९. विषयांकित प्रकरणी या कार्यालयाने या पूर्वी केलेली सर्व शिफारस पत्रे निष्कासित करण्यात येत आहेत.

४०. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार अतिरिक्त अधिभार अधिमुल्य@ ३५%शुल्क रू. १,८५,६००/- चलन क्र. MH००५६१०३६१२०२४२५E, दि. २३/०७/२०२४ अन्वये रक्कमेचा भारतीय स्टेट बँकेत भरणा केलेला आहे. (पूर्व मंजुरीवेळी भरणा केलेली रक्कम वजा करण्यात आलेली आहे.)

४१. उपरोक्त कोणतीही रक्कम अनावधानाने/गणितीय चुकीमुळे अर्जदार यांनी आवश्यकतेपेक्षा कमी अदा केलेली असल्यास उर्वरित रकमेचा भरणा अर्जदार/जमीन मालक/विकासक यांनी करणे बंधनकारक आहे.

४२. प्रस्तावासोबत अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे या कार्यालयाने अभिप्राय दिलेले आहेत. अर्जदाराने सदर प्रकरणी प्रस्तावासोबत सादर केलेली कागदपत्रे अथवा माहिती चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, तसेच विधीग्राहयता नसलेली कागदपत्रे आढळून आल्यास सदरची शिफारस रद्द समजण्यात यावी.

विषयांकित सुधारित रेखांकन व बांधकाम नकाशाची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असणा-या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. (उदा. ७/१२ उतारे, कुलमुख्यत्यार पत्र, संमतीपत्र मोजणी नकाशा) या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत महसूल स्तरावरुन खात्री करणे आवश्यक राहील.

उक्त प्रकरणी या कार्यालयाची तांत्रिक छाननी केवळ रेखांकन/बांधकाम नकाशे प्रचलित नियमावलीनुसार असलेल्या मर्यादेत असून वर व इतर सर्व अनुषंगिक मुद्दयांची छाननी व पुर्तता आपलेकडून करणेत येऊन मंजुरीबाबत पुढील उचित कार्यवाही करणेत यावी.

उक्त प्रकरणी आपणाकडून मंजूरी दिलेनंतर उक्त आदेशासह साक्षांकित नकाशांचा एक संच किंवा मंजुरी नाकारल्यास त्या पत्राची प्रत या कार्यालयाचे अभिलेखार्थ पाठवावी, ही विनंती.

आपला,

सहपत्रे:- नकाशे- ३ संच.

(किशोर भि. पाटील)
सहायक संचालक, नगर रचना,
ठाणे.

TRUE COPY

TOWN PLANNER
Office of Asstt. Director of
Town Planning, Thane.

240690

क्र.महसूल/क-१/टे-८/बां.प./मौ.डोहोळे/भिवंडी/
एसआर-६२/२०२१
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक 6 AUG 2024

वाचले :-

१) श्री. किशोर प्रवेश अग्रवाल रा. ३०१/४०१, रुणवल एलएगांते, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, इन्फिनिटी मॉलच्या मागे, ओशिवरा, अंधेरी (प), मुंबई यांचा दिनांक २१/१०/२०२१, दिनांक ३१/१२/२०२१ व दिनांक ०५/०६/२०२४ रोजीचा अर्ज

२) दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये दिनांक ३०/१०/२०२१, दैनिक ठाणे वैभव या वृत्तपत्रामध्ये दिनांक २५/०१/२०२२ व दैनिक पुढारी या वृत्तपत्रमध्ये दिनांक २५/०१/२०२२ रोजी प्रसिध्द केलेला जाहिरनामा.

३) तहसिलदार भिवंडी यांचेकडील अहवाल क्र.महसुल/क.१/टे.१०/अ.प./एसआर- ५०/२०२१ दि. ३१/०१/२०२२

४) सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचेकडील शिफारस जा.क्र. सुधा. बांप/मौ. डोहोळे /ता.भिवंडी/ स. नं. १२४/६ व इतर/ससंठाणे/२७८१ दि. २४/०७/२०२४

५) उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग भिवंडी यांचेकडील यांचेकडील पत्र क्र.बीडी/ज.बा./ ना.दा/ कावि-९७५८/एसआर-५०/२०२१ दि. १०/११/२०२१ व क्र.बीडी/ज.बा./ ना.दा/कावि-८५६/ एसआर-०६/२०२२ दि. २५/०१/२०२२

६) अर्जदार यांनी दिलेले दिनांक २१/०१/२०२२ चे क्षतपूर्ती बंधपत्र.

७) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८

आदेश :-

ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क्र. १ अन्वये ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील मौजे डोहोळे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील स. नं. १२४/६, क्षेत्र १८१००.०० चौ.मी., स. नं. १२०/३/अ, क्षेत्र १०००.०० चौ.मी., स. नं. १२०/३/ब, क्षेत्र १०००.०० चौ. मी., स. नं. १२०/४/अ, क्षेत्र ११००.०० चौ. मी., स. क्र. १२०/४/ब, क्षेत्र १२००.०० चौ.मी., स. क्र. १२६/६/अ, क्षेत्र ४२००.०० चौ.मी., स. क्र. १२६/६/ब, क्षेत्र ४१००.०० चौ. मी., स. क्र. १२६/१, क्षेत्र १५,७००.०० चौ. मी., स. क्र. १२०/१, क्षेत्र ३००.०० चौ. मी., स. क्र. १२०/२ क्षेत्र ८१५०.०० चौ. मी., स. क्र. १२०/५, क्षेत्र ८००.०० चौ.मी., पैकी ५६५.०० चौ.मी., स. क्र. १२०/६, क्षेत्र ८०००.०० चौ. मी., पैकी ८००.०० चौ. मी., स. क्र. १२२/६ क्षेत्र ६०००.०० चौ.मी. पैकी १८४०.०० चौ. मी., स. क्र. १२२/४, क्षेत्र ९००.०० चौ.मी., पैकी ९०.०० चौ. मी., स. क्र. १२४/१, क्षेत्र १७९००.०० चौ.मी., पैकी १७५६०.०० चौ. मी., स. क्र. १२३/१, क्षेत्र ७०६०.०० चौ.मी., स. क्र. १२९, क्षेत्र ५९९०.०० चौ. मी., स. क्र. ६/७, क्षेत्र ११३००.०० चौ. मी., स. क्र. १२३/३/ब, क्षेत्र ४१३०.०० चौ.मी., स. क्र. १२३/७/अ, क्षेत्र ४७०.०० चौ. मी., स. क्र. १२६/८, क्षेत्र १०००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/अ, क्षेत्र ४९००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/ब, क्षेत्र ४९००.०० चौ.मी., स. क्र. १०३/१२/अ, क्षेत्र ७६८०.०० चौ.मी.,स. क्र. १३०, क्षेत्र ४९८०.०० चौ.मी., स. क्र. ६/५, क्षेत्र ३४००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/१/क, क्षेत्र ३३६०.०० चौ.मी., स. क्र. १२३/६/अ, क्षेत्र ४५३०.०० चौ.मी., स. क्र. १०३/१०, क्षेत्र

१९००.०० चौ. मी. पैकी १६००.०० चौ.मी., स. क्र. १२३/२, क्षेत्र ३०३०.०० चौ. मी., स. क्र. १२३/३/अ, क्षेत्र ३२९०.०० चौ.मी., स. क्र. १२३/४, क्षेत्र २१८०.०० चौ. मी., स. क्र. १२३/५, क्षेत्र १७७०.०० चौ.मी., स. क्र. १२६/२, क्षेत्र १०७००.०० चौ.मी. पैकी ९०००.०० चौ.मी., स. क्र. ०६/०६, क्षेत्र २०००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/२/क, क्षेत्र १६७०.०० चौ.मी., स. क्र. १२२/८/अ, क्षेत्र६४००.०० चौ.मी., पैकी २१८०.०० चौ.मी., स. क्र. १२२/८/ब, क्षेत्र १२४०.०० चौ.मी., स. क्र. १२२/८/ब/१, क्षेत्र ७६०.०० चौ.मी. पैकी ४३०.०० चौ.मी., स. क्र. १२२/१०, क्षेत्र १२००.०० चौ.मी., स. क्र. १०३/६, क्षेत्र ४००.०० चौ.मी., स. क्र. १२२/९/अ, क्षेत्र ३०३०.०० चौ.मी. पैकी १००.०० चौ.मी., स. क्र. ५६/१०, क्षेत्र २४००.०० चौ.मी. पैकी ८७०.०० चौ.मी.एकूण क्षेत्र १,७०,३६५.०० चौ.मी. एवढया जागेचा गोडावून या वाणिज्य बांधकाम प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्याबाबत अर्ज करणेत आलेला आहे.

ज्या अर्थी, या कार्यालयाने दिनांक ३०/१०/२०२१ रोजी दैनिक लोकसत्ता व दिनांक २५/०१/२०२२ रोजी दैनिक ठाणे वैभव व दिनांक २५/०१/२०२२ रोजी दैनिक पुढारी या वृत्तपत्रात जाहिरात दिलेली होती. त्यावर मुदतीत हरकत/तक्रार उपलब्ध कागदपत्रे पाहता या कार्यालयाकडे प्राप्त झालेली दिसून येत नाही.

ज्याअर्थी, जमिनीस आदिवासी हस्तांतरण कायद्याच्या तरतुदी लागू होतात अगर कसे याबाबत "अशी बाब नाही." असे तर परवानगी मागीतलेल्या ७/१२ वरील नोंदी हया मुळ अभिलेखानुसार तंतोतंत आहेत अगर कसे याबाबत 'होय' असे आणि परवानगीची मागणी केलेल्या जागेवर जाणे-येणेसाठी मुंबई नासिक हायवेवरुन डोहोळे गावाकडे जाणारा रस्ता रस्ता उपलब्ध आहे. असे अभिप्राय तहसिलदार भिवंडी यांनी उपोद्घातातील अ.क्र. ३ च्या अहवालामध्ये दिलेले आहेत.

ज्याअर्थी, सहायक संचालक नगररचना ठाणे यांनी यापुर्वी जा.क्र.बिशेप/बांप/मौ.डोहोळे/ ता.भिवंडी/ स.नं. १२४/६व इतर/संसठाणे/१४९९ दि. ३०/५/२०२२ अन्वये सादर केलेली शिफारस निष्प्रभावीत करणेत येत आहे.

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचेकडे केलेल्या अर्जानुसार सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी त्यांचे जा.क्र. सुधा. बांप/मौ. डोहोळे /ता.भिवंडी/ स. नं. १२४/६ व इतर/ससंठाणे/२७८१ दि. २४/०७/२०२४ अन्वये मौजे डोहोळे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील स. नं. १२४/६, क्षेत्र १८१००.०० चौ.मी., स. नं. १२०/३/अ, क्षेत्र १०००.०० चौ.मी., स. नं. १२०/३/ब, क्षेत्र १०००.०० चौ. मी., स. नं. १२०/४/अ, क्षेत्र ११००.०० चौ. मी., स. क्र. १२०/४/ब, क्षेत्र १२००.०० चौ.मी., स. क्र. १२६/६/अ, क्षेत्र ४२००.०० चौ.मी., स. क्र. १२६/६/ब, क्षेत्र ४१००.०० चौ. मी., स. क्र. १२६/१, क्षेत्र १५,७००.०० चौ. मी., स. क्र. १२०/१, क्षेत्र ३००.०० चौ. मी., स. क्र. १२०/२ क्षेत्र ८१५०.०० चौ. मी., स. क्र. १२०/५, क्षेत्र ८००.०० चौ.मी., पैकी ५६५.०० चौ.मी., स. क्र. १२०/६, क्षेत्र ८०००.०० चौ. मी., पैकी ८००.०० चौ. मी., स. क्र. १२२/६ क्षेत्र ६०००.०० चौ.मी. पैकी १८४०.०० चौ. मी., स. क्र. १२२/४, क्षेत्र ९००.०० चौ.मी., पैकी ९०.०० चौ. मी., स. क्र. १२४/१, क्षेत्र १७९००.००

चौ.मी., पैकी १७५६०.०० चौ. मी., स. क्र. १२३/१, क्षेत्र ७०६०.०० चौ.मी., स. क्र. १२९, क्षेत्र चौ. मी., स. क्र. ६/७, क्षेत्र ११३००.०० चौ. मी., स. क्र. १२३/३/ब, क्षेत्र ४१३०.०० चौ.मी., स. १२३/७/अ, क्षेत्र ४७०.०० चौ. मी., स. क्र. १२६/८, क्षेत्र १०००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/अ, क्षेत्र ४९००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/ब, क्षेत्र ४९००.०० चौ.मी., स. क्र. १०३/१२/अ, क्षेत्र ७६८०.०० चौ.मी.,स. क्र. १३०, क्षेत्र ४९८०.०० चौ.मी., स. क्र. ६/५, क्षेत्र ३४००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/१/क, क्षेत्र ३३६०.०० चौ.मी., स. क्र. १२३/६/अ, क्षेत्र ४५३०.०० चौ.मी., स. क्र. १०३/१०, क्षेत्र १९००.०० चौ. मी. पैकी १६००.०० चौ.मी., स. क्र. १२३/२, क्षेत्र ३०३०.०० चौ. मी., स. क्र. १२३/३/अ, क्षेत्र ३२९०.०० चौ.मी., स. क्र. १२३/४, क्षेत्र २१८०.०० चौ. मी., स. क्र. १२३/५, क्षेत्र १७७०.०० चौ.मी., स. क्र. १२६/२, क्षेत्र १०७००.०० चौ.मी. पैकी ९०००.०० चौ.मी., स. क्र. ०६/०६, क्षेत्र २०००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/२/क, क्षेत्र १६७०.०० चौ.मी., स. क्र. १२२/८/अ, क्षेत्र६४००.०० चौ.मी., पैकी २१८०.०० चौ.मी., स. क्र. १२२/८/ब, क्षेत्र १२४०.०० चौ.मी., स. क्र. १२२/८/ब/१, क्षेत्र ७६०.०० चौ.मी. पैकी ४३०.०० चौ.मी., स. क्र. १२२/१०, क्षेत्र १२००.०० चौ.मी., स. क्र. १०३/६, क्षेत्र ४००.०० चौ.मी., स. क्र. १२२/९/अ, क्षेत्र ३०३०.०० चौ.मी. पैकी १००.०० चौ.मी., स. क्र. ५६/१०, क्षेत्र २४००.०० चौ.मी. पैकी ८७०.०० चौ.मी.एकूण क्षेत्र १,७०,३६५.०० चौ.मी. या क्षेत्रावर गोडाऊन या प्रयोजनासाठी अभिन्यास व बांधकाम नकाशांना शिफारस अटी / शर्तींना अधिन राहून केली आहे.

त्याअर्थी आता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४२(क) व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे निहित करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी ठाणे याद्वारे किशोर प्रवेश अग्रवाल, मे सहकार ग्लोबल लिमिटेड, योगिता किशोर अग्रवाल, करण किशोर अग्रवाल, प्रणय किशोर अग्रवाल, भगवानजी नरसी पटेल, बलविरसिंग बलदेवसिंग वालीया, सत्तनामकौर बलजितसिंग वालीया, रमणप्रितकौर बलजितसिंग वालीया, यशाजित बलजितसिंग वालीया यांना भिवंडी तालुक्यातील मौजे डोहोळे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील स. नं. १२४/६, क्षेत्र १८१००.०० चौ.मी., स. नं. १२०/३/अ, क्षेत्र १०००.०० चौ.मी., स. नं. १२०/३/ब, क्षेत्र १०००.०० चौ. मी., स. नं. १२०/४/अ, क्षेत्र ११००.०० चौ. मी., स. क्र. १२०/४/ब, क्षेत्र १२००.०० चौ.मी., स. क्र. १२६/६/अ, क्षेत्र ४२००.०० चौ.मी., स. क्र. १२६/६/ब, क्षेत्र ४१००.०० चौ. मी., स. क्र. १२६/१, क्षेत्र १५,७००.०० चौ. मी., स. क्र. १२०/१, क्षेत्र ३००.०० चौ. मी., स. क्र. १२०/२ क्षेत्र ८१५०.०० चौ. मी., स. क्र. १२०/५, क्षेत्र ८००.०० चौ.मी., पैकी ५६५.०० चौ.मी., स. क्र. १२०/६, क्षेत्र ८०००.०० चौ. मी., पैकी ८००.०० चौ. मी., स. क्र. १२२/६ क्षेत्र ६०००.०० चौ.मी. पैकी १८४०.०० चौ. मी., स. क्र. १२२/४, क्षेत्र ९००.०० चौ.मी., पैकी ९०.०० चौ. मी., स. क्र. १२४/१, क्षेत्र १७९००.०० चौ.मी., पैकी १७५६०.०० चौ. मी., स. क्र. १२३/१, क्षेत्र ७०६०.०० चौ.मी., स. क्र. १२९, क्षेत्र ५९९०.०० चौ. मी., स. क्र. ६/७, क्षेत्र ११३००.०० चौ. मी., स. क्र. १२३/३/ब, क्षेत्र ४१३०.०० चौ.मी., स. क्र. १२३/७/अ, क्षेत्र ४७०.०० चौ. मी., स. क्र. १२६/८, क्षेत्र १०००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/अ, क्षेत्र ४९००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/ब, क्षेत्र ४९००.०० चौ.मी., स. क्र. १०३/१२/अ, क्षेत्र ७६८०.०० चौ.मी.,स. क्र. १३०, क्षेत्र ४९८०.०० चौ.मी., स. क्र. ६/५, क्षेत्र ३४००.०० चौ.मी., स. क्र. ६/२/१/क, क्षेत्र ३३६०.०० चौ.मी., स. क्र. १२३/६/अ, क्षेत्र ४५३०.०० चौ.मी., स. क्र. १०३/१०, क्षेत्र

240693

क्र.महसूल/क-१/टे-८/बां.प./मौ.डोहोळे/भिवंडी/
एसआर-६२/२०२१

.०० चौ.मी., स. क्र. १२३/२, क्षेत्र ३०३०.०० चौ. मी., स. क्र. १२३/३/अ, क्र. १२३/४, क्षेत्र २१८०.०० चौ. मी., स. क्र. १२३/५, क्षेत्र १७७०.०० ०७००.०० चौ.मी. पैकी ९०००.०० चौ.मी., स. क्र. ०६/०६, क्षेत्र २०००.०० त्र १६७०.०० चौ.मी., स. क्र. १२२/८/अ, क्षेत्र६४००.०० चौ.मी., पैकी २/८/ब, क्षेत्र १२४०.०० चौ.मी., स. क्र. १२२/८/ब/१, क्षेत्र ७६०.०० चौ.मी. १२२/१०, क्षेत्र १२००.०० चौ.मी., स. क्र. १०३/६, क्षेत्र ४००.०० चौ.मी., स. क्र. १२२/९/अ, क्षेत्र ३०३०.०० चौ.मी. पैकी १००.०० चौ.मी., स. क्र. ५६/१०, क्षेत्र २४००.०० चौ.मी. पैकी ८७०.०० चौ.मी.एकूण क्षेत्र १,७०,३६५.०० चौ.मी. क्षेत्राची सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी शिफारस केलेल्या बांधकाम आराखडयानुसार रस्त्यासाठीचे ३०७२.९९ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरीत १६७२९२.०१ चौ.मी. क्षेत्रास बेसीक चटई क्षेत्र निर्देशांक ०.२० व त्यावर ०.८०% एन्सिलरी एफ.एस.आय. निर्देशांकाच्या मर्यादेत अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र ३०११२५.६१ चौ.मी. हिशोबित होत असून प्रस्तावित बांधकाम ९१८८७.१४ चौ.मी. या क्षेत्रास गोडावून या वाणिज्य बांधकाम प्रयोजनार्थ वापर करण्याबाबत सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी शिफारस केलेनुसार पुढील शर्तीवर अनुज्ञा (परमिशन) देण्यांत येत आहे.

त्या शर्ती अशा :-

१. ही परवानगी अधिनियम त्याखाली केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यांत आलेली आहे.

२. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४८ नुसार बांधकाम परवानगी ही दिलेल्या तारेखपासून एक वर्षापर्यंत चालू असेल नंतर पुढील वर्षासाठी अर्जदार यांनी योग्य त्या कारणासहीत नियोजन प्राधिकरणाकडे विनंती अर्ज करुन परवानगीचे नुतनीकरण मुदत संपणे आधी करणें आवश्यक राहील. अशा प्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्षाकरीता येईल. वैध मुदतीत बांधकाम पूर्ण केले नसतील तर नविन बांधकाम परवानगी घ्यावी लागेल. नविन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या नियमांचा व नियोजित विकास आराखडयाच्या अनुषंगाने छाननी करण्यांत येईल व ती बाब अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील.

३. महाराष्ट्र शासनाचे मंजूर केलेल्या प्रादेशिक योजनेसाठीच्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियमानुसार सदर रेखांकनात पायाभूत सुविधा जसे अंतर्गत रस्ते, पावसाळी नाले, मल:निस्सारण वय्वस्था, पाणी पुरवठा, खुल्या जागेचा विकास इ. जबाबदारी मालक व विकासक यांची राहील.

४. सहायक संचानक नगररचना ठाणे यांचे शिफारसीन नमुद केलेप्रमाणे स्थळदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे रस्त्यापासून प्रस्तावित बांधकामचे बांधकामाचे पुढील, मागील व बाजुंची अंतरे प्रत्यक्षात जागेवर ठेवणे बंधनकारक राहील.

५. सहायक संचानक नगररचना ठाणे यांचे शिफारसीन नमुद केलेप्रमाणे प्रकरणातील उपअधिक्षक भुमि अभिलेख भिवंडी यांचे कार्यालयाकडील मोजणी नकाशाने केलेल्या वहिवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे अधिन राहून सदरची शिफारस करणेत येत आहे. नियोजीत विकासकामुळे

विषयाधीन जमिनीचे वहिवाटीचे/हद्दीचे अनुषंगाने कोणतेही व्यक्तीगत वा न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/वास्तुविशारद यांची राहील.

६. नियोजीत इमारतीच्या वापरासाठी आवश्यक असलेली सांडपाण्याची व मलनिस्सा:रणाची व्यवस्था उपलब्ध नसल्यास इमारतीच्या वापरापुर्वी अनुज्ञाग्राही यांनी स्वखर्चाने करणे आवश्यक आहे.

७. नियोजीत इमारतीच्या तळमजल्यावरील स्वच्छता गृहे व इतर सुविधा इमारतीतील सर्वांच्या वापरासाठी खुल्या ठेवण्यात याव्यात.

८. भुखंडावरील प्रस्तावित इमारतींचा वापर वाणिज्य (Godown) साठी इमारतीची उंची व मजले बांधकाम नकाशात दर्शविल्याप्रमाणे ठेवणे आवश्यक आहे.

९. बांधकामाच्या structural stability बाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधित नोंदणीकृत संरचनात्मक अभियंता व जमीन मालक / विकासक यांची राहील.

१०. प्रकाश व वायुविजन यासाठी ठेवलेल्या खिडक्यांचे क्षेत्र हे १/१० पेक्षा कमी असणार नाही याची जबाबदारी विकासक / वास्तुविशारद / संस्था यांची राहील.

११. प्रस्तावित योजनेमध्ये खालीलप्रमाणे बांधकामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत

अ.क्र	जमिनीचे एकूण क्षेत्र चौ.मी.	अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र चौ.मी.	प्रस्तावित बांधकाम क्षेत्र			
			इमारत क्र.	प्रयोजन	प्रस्तावित मजल्यांची संख्या	प्रस्तावित P-line बांधकाम क्षेत्र (चौ.मी.)
१	१,७०,३६५.००	३०११२५.६१	गोदाम क्र. १	वाणिज्य	तळ + पहिला मजला	४७२०५.८६
			गोदाम क्र. २	वाणिज्य	तळ + पहिला मजला	३३६२४.८५
			गोदाम क्र. ३	वाणिज्य	तळ + पहिला मजला	३११९.६६
			गोदाम क्र. ४	वाणिज्य	तळ + पहिला मजला	३११६.६२
			गोदाम क्र. ५	वाणिज्य	तळ + पहिला मजला	४१७५.१५
			Driver rest room	वाणिज्य	तळ मजला	१५.००
			Admin Blg (G+१)	वाणिज्य	तळ + पहिला मजला	४५०.००
			Canteen (G+१)	वाणिज्य	तळ + पहिला मजला	१८०.००
			एकूण क्षेत्र चौ.मी.			९१८८७.१४

१२. इमारतीतील नळ फिटींगचे काम, सांडपाणी / पावसाचे पाणी यांची निर्गतीकरणाचे काम कोणत्याही महानगरपालीका किंवा नगरपालीका यांच्याकडे नोंदणीकृत प्लंबरकडुन करुन घेणे आवश्यक आहे. सेप्टीक टँकचे साईज स्टँडर्डप्रमाणे असावेत, पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत पासून सेप्टीक टँन्कचे अंतर १२.० मी. राहणे आवश्यक आहे.

१३. अनुज्ञाग्राही यांनी प्रत्यक्ष वापरापूर्वी इमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या पिण्याचे पाणी तसेच सांडपाणी उपलब्धतेबाबत व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

१४. मंजुर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार अनुज्ञाग्राही यांनी बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

१५. प्रस्तावित केलेल्या इमारतीत ओला कचरा व सुका कचरा यांचे वर्गीकरण व त्यांची विल्हेवाट लावणे याबाबत योग्य ती स्वतंत्र उपाय योजना ही इमारत वापर दाखल्यापुर्वी कार्यान्वित करणे जमीन मालकास/विकासकास बंधनकारक राहील.

१६. प्रस्तावित प्रकल्पाच्या ठिकाणी काम काम करणाऱ्या कामगारांच्या पात्र शाळाबाहय मुलांसाठी शिक्षणाची सोय करणे जमीन मालकास /विकासकास बंधनकारक राहील.

१७. नवीन इमारतींच्या आतील बाजूस तसेच इमारतीसमोरील रस्त्याचे सी.सी.टी.व्ही. चित्रिकरण करण्यासाठी बांधकामाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे जमीन मालकास /विकासकास बंधनकारक राहील.

१८. विषयांकीत जागा किंवा तीचा भाग कोणत्याही प्राधिकरणामार्फत अथवा राज्य अथवा केंद्र शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत अथवा राज्य शासनाचे नियंत्रणाखालील कोणत्याही महामंडळामार्फत संपादन केलेली नाही अथवा आज रोजी संपादनाची कोणतीही कार्यवाही सुरु नसलेबाबत उपविभागीय अधिकारी भिवंडी, विभाग भिवंडी यांनी त्यांचे दिनांक १०/११/२०२१ व २५/०१/२०२२ अन्वये दिसून येत आहे.

१९. नियोजित जागेचे क्षेत्र, स्थान, आकार, वापर, वहिवाट, भोगवटादार, कुळमूखत्यार, भाडेकरु, मालकी हक्काबाबत काही तक्रारी असल्यास त्याची, तसेच लगतव्या भूखंडधारकांच्या काही तक्रारी असल्यास त्याची, संपूर्ण जबाबदारी व त्याचे निराकरण करणे अर्जदार / विकासक/ मालक यांच्यावर बंधनकाकर राहील.

२०. सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी नियोजीत जागेवरील बांधकामाचे मंजुरीची शिफारस केलेल्या नकाशाप्रमाणे कार्यान्वयन, बांधकाम साहित्याची गुणवत्ता व दर्जा, प्रस्तावित इमारतीचे आर.सी.सी. डिझाईन, अग्निशमन व्यवस्था इ. बाबत जमीन मालक/ विकासकर्ता/ वास्तुविशारद/ सल्लागार अभियंता/ स्ट्रक्चरल अभियंता यांची जबाबदारी राहील.

२१. सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी शिफारस केल्याप्रमाणे नियोजीत जागेवरील बांधकाम करताना आय.एस.आय. १३९२०-१९९३ भूकंपरोधक आर.सी.सी. डिझाईन नुसार बांधकाम घटकांचे नियोजन अर्हताप्राप्त नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजीनिअर यांचेकडून करून घेणे आवश्यक असून त्याचे देखरेखीखाली नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे अर्जदार / विकासकर्ता यांचेवर बंधनकारक राहिल.

२२. महाराष्ट्र इमारत व इमारत कामगार नियम २००७ मधील तरतुदी जमीन धारक विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

२३. नियोजीत विकासकामांमुळे विषयाधीन जमिनीचे वहिवाटीचे /हद्दीचे अनुषंगाने कोणतेही व्यक्तीगत वा न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार / वास्तुविशारद यांची राहील.

२४. प्रकरणी शासन निर्णय क्र.बीसीए-२००९/प्र.क्र.१०८/कामगार-७अ दिनांक १७/६/२०१० व शासन निर्णय क्र.बीसीए-२००९/प्र.क्र१०८/कामगार ७अ, दिनांक २१/७/२०११ अन्वये कामगार उपकराची र.रु. १,९५,६८,३००/- चा भरणा आय.सी.आय.सी.आय. बँक, नरीमन पॉईंट, मुंबई शाखा यांचे मार्फत (Demand Draft No. ५०१६८१ Date २९/०७/२०२४) अन्वये Maharashtra Building & Other Construction Workers Welfare Board या नावाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया येथे दि. ३०/०७/२०२४ रोजी भरणा केलेला आहे.

२५. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६, चे कलम १२४ ब मध्ये शासनाने नमुद केल्यानुसार नगरपंचायत या क्षेत्रासाठी लागू केलेल्या विकास शुल्काची (DEVELOPMENT CHARGE) र.रु. १,०७,५८,३००/- चा भरणा आय.सी.आय.सी.आय. बँक, नरीमन पॉईंट, मुंबई शाखा यांचे मार्फत (Demand Draft No. ५०१६८० Date २९/०७/२०२४) अन्वये Collector Thane and Planning Authorty या नावाने भारतीय स्टेट बँक, शाखा कलेक्टर कॅम्पस येथे दि. ३०/०७/२०२४ अन्वये भरणा केलेला आहे.

२६. मंजुर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० नुसार SOLAR ASSISTED WATER HEATING (SWH) SYSTEM/ROOF TOP PHOTOVOLPAIC (RTPV) SYSTEM बसविणे आवश्यक राहील.

२७. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियामावली, २०२० (UDCPR-२०२०) नुसार रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम कार्यान्वित करणे आवश्यक राहील.

२८. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियामावलीनुसार अर्जदार / विकासक यांना Gray Water Treatment and recycling ची व्यवस्था स्वत:च्या जागेत करणे आवश्यक राहील.

२९. मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, सांताक्रुज, मुंबई यांचेकडील आग प्रतिबंधक उपाययोजनेबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रमाणपत्रातीलअटी व शर्ती अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील.

३०. प्रस्तावित जागेमधून २ उच्चदाब विद्युत वाहिन्यांची आखणी असल्याने उक्त वाहिन्यापांसून आवश्यक त्या सुरक्षित अंतरावर बांधकाम प्रस्तावित केलेले आहे. तथापी संबंधीत विभागाकडील ना-हरकत दाखला या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

३१. अनुज्ञाग्राही यांनी बिनशेती मोजणी करणे अर्जदार / विकासक यांचेवर बंधनकारक राहील. तसेच बिनशेती मोजणीमध्ये अर्जदार यांच्या भूखंड क्षेत्रात तफावत आल्यास त्याप्रमाणे सुधारित बांधकाम परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३२. अनुज्ञाग्राही यांनी परवानगी व्यतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम, ५२ ते ५५ अनुसार कार्यावाहीस पात्र राहील.

३३. प्रकरणी राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ रस्त्याच्या रुंदीकरणाने जागेचा काही भाग बाधित होत आहे. नियमानुसार नियंत्रण रेषा प्रस्तावित केलेली आहे. संबंधीत विभागाचा ना-हरकत दाखला प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

३४. प्रस्तावित जागा भातसा उजवा तीर कालवा ३ किमी पट्टयात समाविष्ट आहे. त्यामुळे संबंधीत विभागाचा ना-हरकत दाखला प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

३५. मंजुर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदार / विकासकावर / जमीन मालकांवर बंधनकारक राहील.

३६. प्रकरणी सहायक संचालक नगररचना ठाणे यांनी यापुर्वी सादर केलेली शिफारस निष्कासित करण्यात येत आहे.

३७. अर्जदाराने सदर प्रकरणी सादर केलेली कागदपत्रे अथवा माहिती खोटी / दिशाभूल करणारी आढळल्यास तसेच, विधीग्राहयता नसलेले कागदपत्र आढळून आल्याचे सिध्द झाल्यास दिलेली ही परवानगी ही रद्द समजण्यात येईल व कायदेशीर उद्भवणाऱ्या कार्यवाहीस स्वत: अर्जदार / विकासक हे जबाबदार राहतील. तसेच होणाऱ्या परिणामास व नुकसानीची जबाबदारी अर्जदार यांची वैयक्तीक राहतील.

३८. अनुज्ञाग्राही व्यक्तीने (ग्रँटीने) अशा जमीनीचा वापर व त्यावरील इमारतीच्या आणि किंवा अन्य बांधकामाचा उपयोग उक्त जमीनीचा ज्या प्रयोजनार्थ उपयोग करण्यांस परवानगी देण्यांत आली असेल त्या प्रयोजनार्थ केवळ केला पाहिजे. आणि त्याने अशी जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा अशी इमारत यांचा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून तशा अर्थाची आगाऊ लेखी परवानगी मिळविल्याशिवाय वापर करता कामा नये. इमारतीच्या वापरावरुन जमिनीचा वापर ठरविण्यांत येईल.

३९. अनुज्ञाग्राही व्यक्तीने (अ) संबधित स्थानिक प्राधिकरण यांचे समाधान होईल अशा रीतीने अशा जमीनीत रस्ते, गटारे वगैरे बांधून आणि (ब) भूमापन विभागा कडून अशा भूखंडाची मोजणी व त्यांचे सीमांकन करुन ती जमीन या आदेशाच्या तारखे पासुन एक वर्षाच्या आंत मंजूर आराखडया प्रमाणेच काटेकोरपणे विकसित केली पाहिजे. आणि अशा रीतीने ती जमीन विकसित केली जाई पर्यंत त्या जमीनीची कोणत्याही रीतीने विल्हेवाट लावता कामा नये.

४०. अनुज्ञाग्राही व्यक्तीस असा भुखंड विकावयाचा असेल किंवा त्यांची इतर प्रकारे विल्हेवाट लावायची असेल तर अशा अनुज्ञाग्राही व्यक्तीने तो भूखंड या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेल्या शर्तीचे पालन करुनच विकणे किंवा अशा शर्तीनुसारच त्याची अन्य प्रकारे विल्हेवाट लावणे आणि त्याने निष्पादित केलेल्या विलेखात तसा खास उल्लेख करणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

४१. सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी मंजुरीची शिफारस केलेल्या स्थळ आराखडयात आणि किंवा इमारतीच्या नकाशात निर्दिष्ट केल्या प्रमाणे इतक्या जोते क्षेत्रावरच बांधकाम अनुज्ञेय राहील.

४२. अनुज्ञाग्राही व्यक्तीने सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी नकाशात दर्शविल्या प्रमाणे सीमांतिक मोकळे अंतर (ओपन मार्जीनल डिस्टेंसेस) सोडले पाहिजे.

४३. अनुज्ञाग्राही व्यक्तीने अशा जमीनीचे बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यांस ज्या दिनांका पासून सुरुवात केली असेल किंवा ज्या दिनांकास त्यांने अशा जमीनीच्या वापरात बदल केला असेल तर तो दिनांक त्याने एक महिन्याच्या आंत तलाठया मार्फत **भिवंडी तहसिलदारांस** कळविले पाहिजे. जर तो असे करण्यांस चुकेल तर महाराष्ट्र जमीन महसुल (जमीनीच्या वापरातील बदल व

बिगरशेतकी आकारणी) नियम १९६९ मधील नियम ६ अन्वये त्याच्यावर कार्यवाही करण्यांस असा अनुज्ञाग्राही पात्र ठरेल.

४४. सदरहु आदेशाच्या दिनांकापासुन सदर अनुज्ञाग्राहीने त्या जमिनीच्या संबधात दर चौ.मी. विहीत दराप्रमाणे बिगर शेतकी आकारणी दिली पाहिजे. किंवा परवानगीच्या तारखेच्या पुर्वलक्षी प्रभावाने अथवा त्यानंतर अंमलात येणारे बिनशेती दराने बिनशेती आकार देणे बंधनकारक राहील. अशा जमीनीच्या वापरात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यांत आला तर त्या प्रसंगी निराळया दराने बिगर शेतकी आकारणीच्या हमीची मुदत अजून समाप्त व्हावयाची आहे ही गोष्ट विचारात घेण्यात येणार नाही.

४५. सदर जागेबाबत अति तातडीची मोजणी फी म्हणून रक्कम रु. ५७०००/- (अक्षरी रू. सत्तावन्न हजार मात्र) भारतीय स्टेट बँक, शाखा बोरिवली (प) यांचे मार्फत (धनादेश क्र. ६०१७१४ Date २९/०७/२०२४) अन्वये भारतीय स्टेट बँक, शाखा कलेक्टर कॅम्पस येथे दि. ३०/०७/२०२४ अन्वये भरणा केलेला आहे.

४६. भूमापन विभागाकडून जमीनीची मोजणी करण्यांत आल्या नंतर अशा जमीनीचे जितके क्षेत्रफळ आढळून येईल तितक्या क्षेत्रफळानुसार या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेले क्षेत्र तसेच बिगरशेतकी आकारणी यांत बदल करुन घेणेची जबाबदारी अनुज्ञाग्राही यांची राहील.

४७. सदर जमीनीच्या बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांका पासून दोन वर्षाच्या कालावधीत अनुज्ञाग्राहीने अशा जमीनीवर आवश्यक ती इमारत बांधली पाहिजे. अन्यथा सदरहू आदेश रद्द समजण्यांत येईल व अनुज्ञाग्राही यांना अकृषिक परवानगीसाठी नव्याने अर्ज सादर करावा लागेल.

४८. पुर्वीच मंजूर केलेल्या नकाशावरहुकुम अगोदरच बांधलेल्या इमारतीत अनुज्ञाग्राहीने कोणतीही भर घालता कामा नये किंवा ती मध्ये कोणताही फेरबदल करता कामा नये. मात्र अशी भर घालण्यासाठी किंवा फेरबदल करण्यासाठी जिल्हाधिका-यांची परवानगी घेतली असेल आणि अशा भरीचे किंवा फेरबदलाचे नकाशे मंजूर करुन घेतले असतील तर ती गोष्ट वेगळी.

४९. या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे अनुज्ञाग्राही यक्तीने उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये असा अनुज्ञाग्राही ज्या कोणत्याही शास्तीस पात्र ठरेल त्या शास्ती: बाधा न येऊ देता ठाण्याच्या जिल्हाधिका-यास तो निर्दिष्ट करेल असा दंड आणि आकारणी भरल्यानंतर उक्त जमीन किंवा भूखंड अर्जदाराच्या ताब्यात राहू देण्याचा अधिकार असेल.

५०. प्रस्तुत आदेशामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही या परवानगीच्या तरतूदीविरुदध जाऊन कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभे करण्यांत आले असेल किंवा तरतूदी विरुदध या इमारतीच्या किंवा बांधकामाचा वापर करण्यांत आला असेल तर विनिर्दिष्ट मुदतीच्या आंत अशा रीतीने उभारलेली, इमारत काढून टाकण्या विषयी किंवा तीत फेरबदल करण्याविषयी ठाण्याच्या जिल्हाधिका-याने निर्देश देणे विधी संमत असेल. तसेच ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्याला अशी इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्याचे किंवा तीत फेरबदल करण्याचे काम करवून घेण्याचा

किंवा त्या प्रीत्यर्थ आलेला खर्च अनुज्ञाग्राही व्यक्ती कडून जमीन,महसुलाची थकबाकी म्हणून वसुल करुन घेण्याचा अधिकार असेल.

५१. दिलेली ही परवानगी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि नगरपालिका अधिनियम इ.सारख्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचे कोणतेही उपबंध प्रकरणाच्या अन्य संबंधीत बाबींच्या बाबतीत लागू होतील. त्या उपबंधाच्या अधिन असेल.

५२. जागेच्या मालकी हक्काबाबत व अन्य बाबीबाबत अर्जदार यांनी सत्यप्रतिज्ञालेख दिला आहे. सदर प्रतिज्ञापत्रातील दिलेली माहिती खोटी असल्याचे सिध्द झाल्यास सदर बिनशेती परवानगी आपोआपच रदद झालेचे समजणेंत येईल.

५३. अनुज्ञाग्राही यांनी बिगरशेतकी आकारणीच्या पाचपट रुपांतरीत कर (कन्व्हर्शन टॅक्स) म्हणून रक्कम रु. १,७०,३६५/- (अक्षरी रू. एक लाख सत्तर हजार तीनशे पासष्ठ मात्र) भारतीय स्टेट बँक, शाखा बोरिवली (प) यांचे मार्फत (धनादेश क्र. ६०१७१३ Date २९/०७/२०२४) अन्वये भारतीय स्टेट बँक, शाखा कलेक्टर कॅम्पस येथे दि. ३०/०७/२०२४ अन्वये भरणा केलेला आहे.

५४. अनुज्ञाग्राही यांनी वार्षिक अकृषिक आकारणीचे रक्कम रु. ३४०७३/- (अक्षरी रू. चौतीस हजार त्र्याहत्तर मात्र) भारतीय स्टेट बँक, शाखा बोरिवली (प) यांचे मार्फत (धनादेश क्र. ६०१७१५ Date २९/०७/२०२४) अन्वये भारतीय स्टेट बँक, शाखा कलेक्टर कॅम्पस येथे दि. ३०/०७/२०२४ अन्वये भरणा केलेला आहे.

५५. मौजे डोहोळे, ता.भिवंडी येथील स.नं./हि.नं. १२०/३/अ, १२०/३/ब, १२०/४/अ, १२०/४/ब, १२४/६, १२६/६/अ, १२६/६/ब या जमिनीवर युनियन बँक ऑफ इंडिया या बँकेचा र.रु. ५७,२८,००,०००/- व र.रु. ४२,७२,००,०००/- गहाण खताचा बोजा इतर हक्कात दाखल आहे. सदर बोजा संदर्भात अर्जदार यांनी दि. १/२/२०२२ रोजीचे पत्रान्वये युनियन बँक ऑफ इंडीया यांचेकडे बांधकाम परवानगीसंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेकरिता विनंती अर्ज केलेला आहे. सदर विनंती अर्जाची प्रत प्रकरणी समाविष्ठ केली आहे. तसेच अर्जदार यांनी उपरोक्त आवशया संदर्भात दि. २/२/२०२२ रोजीचे बंधपत्र देखील प्रकरणी समाविष्ठ केले आहेत. तरी अर्जदार यांनी प्रस्तावित जमिनीवर बांधकाम सुरु करणेपुर्वी युनियन बँक ऑफ इंडिया यांचे ना-हरकत प्रमापणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

५६. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५७ मध्ये अधिकार अभिलेखातील नोंद आणि फेरफार नोंदव्रहित प्रमाणित नोंद कायदेशिररित्या दाखल करण्यात येईपर्यंत किंवा त्याबद्दल नविन नोंद कायदेशीर दाखल करण्यात येईपर्यंत खरी असल्याचे गृहीत धरणेत येईल असे नमुद केले आहे. तरी प्रस्तावित जमिनीचे मालकीहक्काबाबत भविष्यात वाद उद्भवल्यास त्याचे निवारण करणेची सर्वस्वी जबाबदारी अनुज्ञाग्राही यांची राहील. व दिलेली परवानगी रद्द समजणेत येईल.

५७. प्रस्तुत आदेशातील शर्ती हया अर्जदार यांचेवर तसेच त्यांचे / तीचे वाली वारस त्याचप्रमाणे प्रस्तुत जमीनी संदर्भात त्यांनी प्राधिकृत केलेल्या / अधिकार प्रदान केलेल्या / कुळमूखत्यार पत्र दिलेल्या सर्वांवर बंधनकारक राहतील.

क्र.महसूल/क-१/टे-८/बां.प./मौ.डोहोळे/भिवंडी/
एसआर-६२/२०२१

५८. प्रस्तुत परवानगीनुसार जमीन मालक / विकासक यांनी जागेवर खालील प्रमाणे माहिती दर्शविणारा फलक लावणे आवश्यक आहे.

१) जमीन मालक / विकासक / वास्तुविशारद / ठेकेदार यांचे नाव व पत्ता.

२) बिनशेती जमिनीचे हद्दी दर्शविणाऱ्या तपशिलासह स.नं. / हि. नं. ची माहिती.

३) बिनशेती परवानगीचा आदेश क्रमांक व दिनांक.

४) मंजुर चटई क्षेत्र निदेशांक

५) मंजुर नकाशाची प्रत पाहणेसाठी उपलब्ध असलेल्या ठिकाणाचा पत्ता.

६१. अनुज्ञाग्राही यांना जिल्हा परिषद ठाणे यांनी बसविलेला विशेष कर भरणा करणे बंधनकारक आहे.

६२. अनुज्ञाग्राही यांनी सहाय्यक संचालक नगररचना ठाणे मंजुरीची शिफारस केलेल्या बांधकाम नकाशा व्यतिरीक्त जादा बाधंकाम केल्यास अगर बाधंकाम मध्ये बदल करुन जादा चटईक्षेत्र निदेशांक वापरल्यास अनुज्ञाग्राही हे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ अन्वये फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यास पात्र राहतील व असे जादाबाधंकाम दुर करण्यास पात्र राहील.

६३. प्रस्तुत आदेशातील शर्तीचा भंग अर्जदार यांनी केल्याचे सिध्द झाल्यास दिलेली ही बिनशेती परवानगी आपोआपच रद्द झालेचे समजणेत येईल व त्यासाठी स्वतंत्र आदेश काढणेची आवश्यकता राहणार नाही.

सही/-
(अशोक शिनगारे)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रति,
श्री. किशोर प्रवेश अग्रवाल
रा. ३०१/४०१, रुणवल एलएगांते, लोखंडवाला कॉम्प्लेक्स,
इन्फिनिटी मॉलच्या मागे, ओशिवरा, अंधेरी (प), मुंबई

प्रत :- तहसिलदार भिवंडी,

२/- अनुज्ञाग्राही व्यक्तीने सदर जमीनीचा बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यांस सुरुवात केली आहे किंवा कसे या बाबतच्या त्याच्या अहवालावर त्याने लक्ष ठेवले पाहिजे. असा अहवाल मिळाल्यानंतर अनुज्ञाग्राही व्यक्तीकडून त्याने बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांका पासून बिगरशेतकी आकारणीची रक्कम वसुल करण्या करिता नोंद घेण्याची पुस्तीका मधील तालुका नमुना नं. २ व ग्राम नमुना नं. २ यामध्ये आवश्यक ती नोंद घेण्याची तजवीज केली पाहिजे. अर्जदार यांनी जमीनीची मोजणी फी दिली असल्याने त्या बाबतीत तहसिलदाराने उप अधिक्षक भूमी अभिलेख भिवंडी यांस मंजूर नकाशे व संबंधित जमीनीच्या बाबतीत अधिकार अभिलेखाचे उतारे पाठविले पाहिजेत.

प्रत :- उपअधिक्षक भुमि अभिलेख भिवंडी यांना माहितीसाठी

240701

क्र.महसूल/क-१/टे-८/बां.प./मौ.डोहोळे/भिवंडी/
एसआर-६२/२०२१

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना

प्रत :- तलाठी सजा डोहोळे यांजकडे माहितीसाठी रवाना.

प्रत :- कार्यालयीन संचिका.

{स्थळप्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे}

(रेवण लेंभे)
तहसीलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे